**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८.**

**मा.विधी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक - २१**

**सभावृत्तांत**

**दिनांक – ०१/१०/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०१/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहाततर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
५. मा.गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) नवीन जिजामाता रूग्णालय पिंपरी येथील यंत्रणेची फायरफायटिंग आणि फायर अलार्म यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे आणि अनुषंगिक कामे करणे. 2021-22 या कामास र.रू.24,99,497/- यास प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

विषय क्र.४) अभ्यास दौरा आयोजित मान्यता बाबत - मा.अनुराधा गोफणे व मा. सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.विधी समिती सभा **(कार्यपत्रिका क्र.२०)** दि.१७/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०१/१०/२०२१ विभाग : ग क्षेत्रिय विदयुत

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि) यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/वि/काविर/५७/२०२१, दि.२१/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता (वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नवीन जिजामाता रूग्णालय, पिंपरी हे कोवीड-१९ करिता डेडीकेटेड रूग्णालय आहे. जुन्या जिजामाता रूग्णालयातील ओपीडी देखील नवीन जिजामाता रूग्णालयात स्थलांतरित केली आहे. नवीन जिजामाता रूग्णालयात बसविलेली ई.पी.बी.एक्स यंत्रणा सुरळित सुरू ठेवणेसाठी सदर यंत्रणेची नियमित देखभाल दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी कामाची तातडीने निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रू.७,२८,५७१/- एवढा खर्च अपेक्षित आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १९८७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, दि. १३/०३/२०२० पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (३) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. नवीन जिजामाता रूग्णालय पिंपरी येथील ई.पी.बी.एक्स. यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे आणि अनुषंगिक कामे करणे. २०२१-२२ या कामास र.रू.७,२८,५७१/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च भांडार विभागाकडील “कोवीड-१९ निधी ” या लेखाशीर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६० विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०१/१०/२०२१ विभाग : ग क्षेत्रिय विदयुत

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि) यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/वि/काविर/५६/२०२१, दि.२१/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता (वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नवीन जिजामाता रूग्णालय, पिंपरी हे कोवीड-१९ करिता डेडीकेटेड रूग्णालय आहे. जुन्या जिजामाता रूग्णालयातील ओपीडी देखील नवीन जिजामाता रूग्णालयात स्थलांतरित केली आहे. नवीन जिजामाता रूग्णालयात बसविलेली सीसीटीव्ही यंत्रणा सुरळित सुरू ठेवणेसाठी सदर यंत्रणेची नियमित देखभाल दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी कामाची तातडीने निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. विषयांकित काम

करणेसाठी र.रू.१९,०४,६३६/- एवढा खर्च अपेक्षित आहे. जिजामाता हॉस्पिटलमधील CCTV ची देखभाल दुरुस्ती व अनुषंगिक कामे करणे.(२०२१-२२) या कामास र.रू.१९,०४,६३६/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचा खर्च भांडार विभागाकडील "कोवीड-१९ निधी"या लेखाशीर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ६१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०१/१०/२०२१ विभाग : ग क्षेत्रिय विदयुत

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि) यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/वि/काविर/६५/२०२१, दि.२८/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता (वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नवीन जिजामाता रूग्णालय, पिंपरी हे कोवीड-१९ करिता आहे. जुने जिजामाता रूग्णालयातील ओपीडीचे देखील नवीन जिजामाता रूग्णालयात स्थलांतर झाले आहे. नवीन जिजामाता रूग्णालयात हायड्रंट, स्प्रिंक्लर आणि फायर अलार्म व्यवस्था बसविलेली आहे. सदर यंत्रणा सुरळित सुरू ठेवणे अत्यावश्यक आहे. त्याकामी तीन शिफ्ट मध्ये फायर फायटिंग यंत्रणा चालन आणि देखभाल दुरूस्ती करणेसाठी अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यास र.रू.24,99,497/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम करणे आवश्यक असल्याने कामास र.रू.24,99,497/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाचा खर्च भांडार विभागाकडील कोवीड-१९ निधी या लेखाशीर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०१/१०/२०२१

सुचक : मा. अनुराधा गोफणे अनुमोदक : मा. सुजाता पालांडे

संदर्भ - मा.अनुराधा गोफणे व मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत मा.विधी समिती सदस्यांना कायदा सुव्यवस्थाची पाहणी करण्याकरिता अभ्यास दौ-याचे आयोजन केले जाते. या अभ्यास दौरा करण्याकरिता सिक्किम या राज्यात कायदा व्यवस्थाची पाहणी करिता मा.विधी

समिती सदस्यांचा तसेच संबंधित अधिकारी यांचा सिक्किम या राज्यात अभ्यास दौरा आयोजीत करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती-**विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४७१/२०२१
दिनांक : ०६/१०/२०२१

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.